## नियमीत दिवाणी मुकदमा नं.३४४/२०१९ मधील

## निशाणी– ३९, ४१ व ४३ वरील आदेश

सदरचे अर्ज प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या विरूध्द झालेल्या विना कैफियत आदेश रद्द होवून तसेच प्रतिवादी क्रं. ३ विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मुळ दाव्यास कैफीयत व निशाणी ५ च्या अर्जास जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफीयत व जबाब दाखल करुन घेणेसाठी दाखल केलेले आहेत.

२. प्रतिवादी प्रतिवादी क्र.१ व ३ यांचे थोडक्यात कथन की, दि.१५/१०/२०२२ रोजी प्रतिवादी क्रं. १ व ३ यांना दाव्याचे समन्स व नोटीस बजावण्यात आले. परंतु प्रतिवादी क्रं. १ यांच्या पत्नीचे दोन्ही पाय वादींच्या मारहाणीत मोडलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ यांच्या पत्नीस पुणे येथे व इतर ठिकाणी दवाखाण्यात दाखल करून ऑपरेशन व इतर औषधउपचार करणे आवश्यक होते. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ यांना वकीलांची भेट घेवून दाव्याचे कामी कैफियत देणे मुदतीत जमले नाही. तसेच प्रतिवादी क्रं. १ हे प्रतिवादी क्रं. ३ तर्फे दाव्याचे कामकाज पाहणार होते परंतू वरील नमूद कारणामुळे प्रतिवादी क्रं. १ हे प्रतिवादी क्रं. ३ तर्फे हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्रं. ३ यांना देखील वकीलांची भेट घेवून दाव्याचे कामी कैफियत देणेसाठी न्यायालयात हजर राहणे जमले नाही. सदरील प्रतिवादी क्रं.३ हे न्यायालयात हजर राहू शकले नाहीत त्यामुळे दि. ०५/०१/२०२३ रोजी न्यायालयाने त्यांच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. सदरचे प्रतिवादी क्रं. १ व ३ यांना दाव्यास कैफियत दाखल करण्यास अंदाजे ३ महिन्यांचा विलंब झालेला आहे. तरी प्रतिवादी क्रं. १ यांच्या विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून यांना लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून तसेच प्रतिवादी क्रं. ३ विरूध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून विना कैफियत आदेश रद्द होवून यांना लेखी

जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून प्रतिवादी क्रं. १ व ३ यांची लेखी कैफियत दाव्याकामी घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. सदरील अर्ज मंजूर न झाल्यास कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. याउलट विना कैफियत आदेश तसेच प्रतिवादी क्रं. ३ विरूध्दचा एकतर्फा आदेश व विलंब माफ केल्यास वादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. प्रतिवादी १ व ३ यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी–४०, ४२ व ४४ वर प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत.

३. वादी विधीज्ञांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदवून अर्जातील नमुद कारणे साफ खोटी असून संयुक्तीक नसल्याने प्रतिवादी क्र.१ व ३ यांचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच न्यायालयास सदरील अर्ज मंजूर करावयाचे वाटल्यास सदरील अर्ज जास्तीत जास्त दंड आकारुन मंजूर करावा असे नमुद केले आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व ३ यांना दि. १५/१०/२०२२ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी कं. १ हे दि.२३/११/२०२२ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. त्यानंतर त्यांनी मुदतीत कैफीयत व जबाब दाखल केलेला नाही, त्यामुळे त्यांना जबाब व कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. तसेच प्रतिवादी क्रं. ३ या न्यायालयात हजर न झाल्याने दि. ०५/०१/२०२३ रोजी त्यांच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. सदर प्रतिवादी यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सदर अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या अर्जातील नमुद कारणे संयुक्तीक आहेत, त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता व सदरील दावा गुणदोषावर निर्णयीत करण्यासाठी प्रतिवादी क्रं. ३ विरूध्दचा एकतर्फा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र. १ व ३ यांना कैफीयत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य व क्रमप्राप्त आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी केलेल्या विलंबामुळे वादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करून चालणार नाही

म्हणुन प्रतिवादी क्र.१ व ३ यांचे अर्ज दंड लावून मंजूर करणे योग्य राहिल. कारणे आदेश :–

## आदेश

१. अर्ज रक्कम **रु.४००/–** च्या खर्चासह मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्रं. ३ विरूध्दचा एकतर्फा आदेश रद्द होईल व प्रतिवादी क्रं. १ व ३ यांची कैफीयत व निशाणी–५ च्या अर्जास जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

sd/-

दिनांक : २३/०६/२०२३.

**(श्री. एम. एस. भरड)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.